# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. १०
## सभावृत्तांत

दिनांक :- १८/१२/२०१५ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक १८/१२/२०१५ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३. मा.शमीम पठाण
४. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
५. मा.अपर्णाताई डोके,
६. मा.को-हाळे अनंत सुभाष
७. मा.शिदे शितल उर्फ विजय गोरख
८. मा.साबळे छाया जगन्नाथ
९. मा.बारणे निलेश हिरामण
१०. मा.झामाबाई बाळासाहेब बारणे
११. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१२. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१३. मा.कलाटे स्वाती मयूर
१४. मा.पाषाणकर गोरक्ष दशरथ स्वीकृत सदस्य
१५. मा.शेडगे गिरीष ज्ञानेश्वर
१६. मा.लुणावत शरद माणिकचंद

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.योगेश कडुसकर – क्षेत्रिय अधिकारी ,मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.गटटुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.शशिकांत मोरे – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.के.डी.फुटाणे – उप अभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.बी.कोंडे – उपअभियंता, स्थापत्य, मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, श्रीमती पाठक ए.ए. उपअभि यंता, झोनिपु विभाग , मा.ए.बी.पाटील - उपअभियंता, विदयुत विभाग, मा.भाऊसाहेब साबळे – उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.ग्वालवंशी एस.जे.- प्र.उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, मा.राजेंद्र व्ही.डुंबरे – प्रभारी उपअभियंता, जलनिसारण विभाग, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्याधिकारी, श्री.वामन बाबुराव नेमाणे – कार्यालयीन अधिक्षक (अतिक्रमण पथक प्रमुख) ब क्षेत्रीय कार्यालय, श्री.सुखदेव कांबळे – वरिष्ठ लिपीक, पीएमपीएल विभाग, इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ९, दि. २६/११/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

तदनंतर **उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक ३ ब क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये थेरगांव प्रभाग क्रमांक ५० चा समावेश होतो. क्रांतीवीरनगर लेन २ या ठिकाणी वर्धमान वाटीकाकडे जाणा-या रस्त्यावर कमान करण्यास तसेच सदर कमानीस कै.बाबुराव पांडू बारणे प्रवेशव्दार असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.सौ.झामाबाई बारणे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४ मोरया गोसावी क्रिडांगणासमोरील महिलांसाठी उभारलेल्या बैठक व्यवस्थेस कै.अनिल श्रीकृष्ण कुलकर्णी स्मरणार्थ असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.अपर्णा डोके यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ६३ — विषय क्र. १

दि. १८/१२/२०१५ — विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. निलेश बारणे — अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. माया संतोष बारणे यांचा दिनांक २०/११/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- प्रभाग क्रमाक ५१ गणेशनगर – बेलठिकानगर थेरगांव परिसरातील पंचशिल कॉलनी क्रमांक १ डॉ.बाबासाहेब आंबेडकर पथ, २. पंचशिल कॉलनी क्रमांक २ ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पथ, ३. समर्थ कॉलनी गणेशनगर, थेरगांव, ४. मयुरबाग कॉलनी गणेशनगर, वाकडरोड, थेरगांव या रस्त्यांचे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.माया संतोष बारणे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६४ — विषय क्र. २

दि. १८/१२/२०१५ — विभाग – नगररचना व विकास विभाग

सुचक : मा. यमुनाताई पवार — अनुमोदक: मा. आशाताई सुर्यवंशी

संदर्भ :- मा.शेखर ओव्हाळ व मा.यमुनाताई पवार यांचा यांचा दि. १४/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये कलम २९ ब, २९ क , २९ ड, व २९ इ मध्ये क्षेत्रसभेबाबत तरतुद आहे. त्यानुसार मा.आयुक्त सो. यांनी महापालिका कार्यक्षेत्रात क्षेत्रीय कार्यालय प्रभाग / वॉर्ड स्तरावर क्षेत्रसभा घेणेकामी आदेश क्र.बक्षेका/सभा/कावि/१६३/२०१५, दिनांक १४/९/२०१५ अन्ये मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार प्रभाग क्रमांक ५२ वॉर्डाचे नांव ताथवडे पुनावळे मध्ये दिनांक ८/१२/२०१५ रोजी दुपारी ४.०० वाजता देवकी नंदन मंगल कार्यालय ताथवडे या ठिकाणी क्षेत्रसभा आयोजित करण्यात आली

होती. सदर क्षेत्रसभेमध्ये या प्रभागातील काही नागरीकांनी ताथवडे गावाचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला आहे. या गावाची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अन्वये मा.महापालिका सभा ठराव क्रमांक ४४८, दिनांक १८/१/२०१४ विकास योजना फेर बदल संबंधीची दिनांक २३/७/२०१४ रोजीची सुचना दैनिक सकाळी मध्ये दिनांक २८/७/२०१४ रोजी प्रसिध्द झालेली आहे. परंतु अदयाप पर्यंत विकास योजना (डेव्हलपिंग प्लॅन) मंजूर झालेला नाही. तरी सदरची गावाची विकास योजना लवकर मंजूर होणेकामी प्रभागातील काही नागरीकांनी दिनांक ८/१२/२०१५ रोजीच्या क्षेत्रसभेमध्ये सुचना / मागणी केलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २९ (ई) चा पोट कलम २ अ नुसार क्षेत्रसभेने केलेल्या सुचनांवर केलेल्या कार्यवाहीसह क्षेत्रसभेच्या अधिकारीतेच्या संबंधात प्रभाग समितीने किंवा महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाची माहिती मिळविणे हा क्षेत्रसभेचा हक्क व अधिकार आहे. त्यानुसार उक्त अधिनियमाचे कलम २९ ड (१) (इ) नुसार क्षेत्रसभेचे कार्य व कर्तव्य आणि हक्क व अधिकार विचारात घेता प्रभाग क्रमांक ५२ (ताथवडे पुनावळे) या प्रभागात दिनांक ८/१२/२०१५ रोजी झालेल्या क्षेत्रसभेमध्ये प्रभागातील नागरीकांनी ताथवडे गावाची विकास योजना लवकरावत लवकर मंजूर करणेकामी शासनास विनंती करावी व तसा ठराव करावा अशी सुचना व मागणी केली आहे. त्यानुसार ताथवडे गावाची विकास योजना महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर मंजूर करणेकामी शासनास विनंती करणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव कायम होणेची वाट न पहाता पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६५ विषय क्र. ३
दि. १८/१२/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा. निलेश बारणे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा यांचा दिनांक १८/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

ब क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये थेरगांव प्रभाग क्रमांक ५० चा समावेश होतो. क्रांतीवीरनगर लेन २ या ठिकाणी वर्धमान वाटीकाकडे जाणा-या रस्त्यावर स्वखर्चाने कमान करण्यास तसेच सदर कमानीस कै.बाबुराव पांडू बारणे प्रवेशव्दार असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ६६ विषय क्र. ४
दि. १८/१२/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. झामाबाई बारणे अनुमोदक: मा. निलेश बारणे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा यांचा दिनांक १८/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

मोरया गोसावी क्रिडांगणासमोरील महिलांसाठी उभारलेल्या बैठक व्यवस्थेस कै.अनिल श्रीकृष्ण कुलकर्णी स्मरणार्थ स्मरणार्थ असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ २३ /२०१६.
दिनांक : २२/ ०१ /२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना